दैनिक हेराल्ड - 28/3/15

# 'पर्यावरण संवर्धनाद्वारे विकास आवश्यक'

## ▶ गाडगीळांच्या अहवालाला अकारण विरोध
## ▶ स्थानिकांना विश्वासात घेऊनच पर्यावरण संवेदनशीलतेचे नियम लागू व्हावेत

**डिचोली, दि. २७ (प्रतिनिधी) :**

विकासाचे प्रकल्प हाती घेत असताना जैवसंपदा पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणाला प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. कळणे येथील खाण प्रकल्पामुळे गावातील व परिसरातील जलस्रोत नाहीशे झाले आहेत. स्थानिकांना परिसरातील जैवसंपदेच्या घटकांचा लाभ मिळणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे खासदार विनायक राऊत यांनी केले.

दोडामार्ग येथील नवनिर्माण महाविद्यालयाच्या भूगोल विभागातर्फे 'पश्चिम घाट जागतिक वारसा स्थळ, पर्यावरण आणि विकास' या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. माधव गाडगीळ समितीने पश्चिम घाटाच्या सद्यस्थितीबाबत जो अहवाल सादर केला होता, तो अभ्यासपूर्ण असाच आहे. परंतु सुरुवातीपासूनच या अहवालाबाबत जनमानसात अकारण गैरसमज निर्माण केल्याने ठिकठिकाणी चुकीच्या माहितीमुळे चांगल्या अहवालाला विरोध झाला.

केंद्र सरकारने डॉ. कस्तुरीरंगन यांना या अहवालाबाबत अभ्यास करण्यासाठी नेमले होते. या साऱ्यामुळेच पश्चिम घाटच्या संरक्षणासंदर्भात शासनाने तसेच त्या परिसरातील लोकांनी ठोस भूमिका घेतलेली नाही. गृह बांधणीसाठी रेती, चिरे त्याचप्रमाणे अन्य घटकांना विश्वासात घेऊनच पर्यावरण संवेदनशीलतेचे नियम लागू केले पाहिजेत, असेही ते पुढे म्हणाले.

कोकण, गोवा आणि परिसरातील पश्चिम घाटाच्या क्षेत्रात रस्ते, रेल्वे, खनिज उत्खनन आणि विकासाच्या नानाविध प्रकल्पांमुळे जैवविविधतेचे मोठे नुकसान झाले आहे. असे डॉ. हेमंत पेडणेकर यांनी याप्रसंगी सांगितले. असणिये, डोंगरपाल सारख्या गावात कळणे प्रमाणे खाण व्यवसाय सुरू झाला तर या गावातील जैवसंपदा नष्ट होईल. सातत्याने निसर्गावर होणाऱ्या कुरघोडीला आळा घालण्याचा तसेच जैवसंपदेच्या संवर्धनासाठी भारतात प्रामाणिक प्रयत्न झाल्याचे दिसत नाहीत. ब्रिटिश राजवटीत कोकणात रेल्वे मार्ग झाला असता, तर आजच्या इथल्या सह्याद्रीची परिस्थिती बिकट झाली असती. जैतापूर येथील अणुऊर्जा प्रकल्प ज्या परिसरात उभा राहणार आहे तसेच पश्चिम किनारपट्टीच्या परिसरात जे प्रकल्प येऊ घातलेले आहेत त्यामुळे येथील जैवसंपदा व लोकजीवनावर वाईट परिणाम होणार असल्याचेही त्यांनी पुढे सांगितले.

यावेळी बाबूराव धुरी यांनी कळणेच्या खाणीच्या रूपाने या परिसरात कसे संकट ओढवले, कृषी संपन्न दोडामार्ग तालुक्यात नवीन खाणी कशा हानिकारक आहेत, त्याबाबत माहिती दिली. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. पर्यावरण अभ्यासक राजेंद्र केरकर यांनी गोवा महाराष्ट्र आणि सह्याद्री येथील पश्चिम घाटातील नैसर्गिक संपदेचे दर्शन घडविले.

